महाराष्ट्राचा स्वतंत्र अस्तित्वासाठी निर्माण झालेल्या संयुक्त महाराष्ट्र चळवळीपासुनच महाराष्ट्राच्या राजकारणाची स्वतंत्र्य ओळख संपूर्ण भारतभर निर्माण झाली होती. भारताचा राजकारणात जातीचा घटक अतिशय महत्वाची भूमिका निभावतो त्याप्रमाणे महाराष्ट्राच्या राजकारणात देखील जातीच्या भूमिकेला महत्वाचे स्थान आहे. महाराष्ट्रात ब्राम्हण, मराठा, कुणबी, माळी, धनगर, वंजारी, भटके - विमुक्त गट, अनुसूचित जाती आणि जमाती यांचे अस्तित्व आहे. या सर्व जात समुहांचा महाराष्ट्राचा राजकारणात व राजकीय प्रक्रियेत कमी, अधिक प्रभाव पडलेला आहे. यातील काही महत्वाच्या जाती आणि महाराष्ट्राचे राजकारण यांचा संबंध सदर संशोधन लेखात मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

**संशोधन लेखाची उद्दीष्टे :**

१) महाराष्ट्राचा राजकारणातील जात व राजकारण यांचा संबंध तपासून पाहणे.
२) महाराष्ट्रातील प्रभावशाली जाती व राजकीय पक्ष यांचा सहसंबंध अभ्यासणे.
३) जात आणि बिगर काँग्रेसी सरकार यांच्यातील बदलणारे संबंध शोधणे.
४) समकालात महाराष्ट्रातील जातीचे राजकारण तपासणे.

सदर संशोधन लेखाची वरील चार प्रमुख उद्दीष्टांच्या चौकटीत मांडणी करण्याचा प्रयत्न खालील प्रकारे केला आहे. जात हा घटक भारताच्या राजकीय व्यवस्थेच्या प्रक्रियेतील अतिशय महत्वाचा घटक आहे. भारतात सामाजिक स्तरावर जातीव्यवस्थेची उतरंड आहे. याच आधारावर उतरंडी प्रमाणे जातींना राजकीय सत्तेतील वाटा मिळतो. महाराष्ट्रात ज्या जातींना अस्तित्व आहे त्यांना त्यांच्या सामाजिक स्थानावरून सत्तेचा आयाम प्राप्त होत असतो. राजकीय सत्ता मिळविण्यासाठी प्रत्येक जात राजकारणात सहभागी होण्याचा प्रयत्न करते त्यातुनच जातीचे राजकीयकरण होत असते. असा निष्कर्ष प्रा. रजनी कोठारी यांनी व्यक्त केला आहे. तर भारताच्या प्रत्येक घटकराज्यात काही वर्चस्वशाली जाती आहेत त्यांनाच राजकीय सत्तेमधली वाटा सर्वाधिक स्वरुपात मिळाला आहे. असे मत एम.एन. श्रीनिवास यांनी व्यक्त केले आहे. याशिवाय लोकशाही व्यवस्थेत जातींना दबावगटाचे स्वरुप येत असल्याचे रुडॉल्फ व रुडॉल्फ यांनी विश्लेषण केले आहे. भारताचा जात व राजकारण या प्रमाणेच महाराष्ट्र व जात राजकारण यांचा अभ्यास करुन महाराष्ट्रात काही विश्लेषणे मांडली आहेत यात प्रा. व.म. सिरसीकर, जयंत लेले, अँथनी कार्टर, डॉ. राजेंद्र व्होरा, डॉ. सुहास पळशीकर, डॉ. प्रकाश पवार, डॉ. नितिन बिरमल, डॉ. नीता बोकील ह्या प्राध्यापक प्रभुतींनी आपल्या संशोधन साहित्याच्या आधारे जात आणि राजकारण यांच्या संबंधाचा आढावा घेतला आहे.

Scanned by CamScanner

आजच्या महाराष्ट्राला संयुक्त महाराष्ट्र म्हणुन १ मे १९६० रोजी मान्यता मिळाली. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत बिगर काँग्रेसी पक्षांची भूमिका महत्वाची होती. परंतु या चळवळीचे व संयुक्त महाराष्ट्र निर्मितीचे श्रेय मिळविण्याचा प्रयत्न काँग्रेसी नेत्यांनी केला याचा फायदा मात्र द्विभाषिक मुंबई नंतर पुन्हा यशवंतराव चव्हाण यांना झाला व ते संयुक्त महाराष्टाचे पहिले मुख्यमंत्री झाले. या दरम्यानच्या काळात राज्य मराठी की? मराठ्यांचे? असे प्रश्न उपस्थित केले गेले (कारण संयुक्त महाराष्ट्रात सर्वाधिक संख्या हि मराठा जातीची होती) या प्रश्नाला यशवंतरावांनी मराठी चे राज्य असे उत्तर देवून त्यासाठी बेरजेच्या राजकारणाचा वापर केला आणि काँग्रेस पक्षाला सत्तेत बळकट केले होते. परिणामी विरोधी पक्षांचा प्रभाव नंतरच्या काळात उत्तोरत्तर कमी होत गेला व महाराष्ट्राच्या राजकारणात मराठी पेक्षा मराठा जातीला सत्तेत अधिक वाटा मिळण्यास सुरुवात झाली. याचा प्रारंभ जरी जेधे - गांडगीळ युतीतून झाला असला तरी फायदा मात्र संयुक्त महाराष्ट्र राज्य झाल्यावर झाला. संयुक्त महाराष्ट्र राज्याच्या निर्मिती आधी राजकीय सत्तेमध्ये ब्राम्हण जातीला स्थान होते मात्र नंतरच्या काळात तो वाटा कमी होत जावून मंडलीकरणातून तो इतर मागास जातींना मिळू लागला. महाराष्ट्राचा राजकारणात जातींना महत्व संख्याबळाच्या आधारावर मिळाले. महाराष्ट्रात मराठा-कुणबी जातींची संख्या अधीक असल्यामुळे सत्ता व सत्तेचे केद्रस्थान हे सतत मराठा जातीकडे राहिले आहे.

जात आणि राजकीय पक्ष यांचा संबंध महाराष्ट्राच्या राजकारणात महत्वाचा मानला जातो महाराष्ट्रात मराठा जात ही वर्चस्वशील जात अथवा प्रभावशाली जात म्हणून ओळखली जाते. एकुण संख्याबळ आर्थिक सत्ता, तसेच भौतिक साधनांची मालकी यामुळे या जातीला राजकारणात आपले वर्चस्व प्रस्थापित करणे सहज शक्य झाले. या वर्चस्वाशाली जातीचा फायदा महाराष्ट्रात काँग्रेस पक्षाला झाला. याच जातीच्या आधाराने काँग्रेस पक्ष महाराष्ट्रात सतत सत्तेत राहिला. त्यामुळे महाराष्ट्र - काँग्रेस - मराठा असा राजकारणात संहसंबंध निर्माण झाला व सर्वाधिक टिकला आहे. काँग्रेस पक्षाने महाराष्ट्रात संयुक्त महाराष्ट्र चळवळीपासूनच मराठा जातीला पक्षात विशेष स्थान दिले आहे. यासाठी सत्तेच्या राजकारणात मराठा जातीला त्याच्या संख्येच्या व अस्तित्वाच्या प्रमाणात वाटा दिला आहे. यासाठी इतर ही संस्थामक यंत्रणाचा उपयोग काँग्रेस पक्षाला करता आला विशेषत: स्थानिक स्वराज्य संस्था सहकारी क्षेत्र यांच्या आधारे मराठा जातीच्या नेतृत्वाला स्थानिक ते राज्यपातळी पर्यंत सत्तेत सामावून घेतले याचा फायदा काँग्रेस व मराठा जात या दोघांना झाला. सुरवातीच्या काळात काँग्रेस पक्षाच्या विरोधी राजकारणात काही अंशी मराठा जातीचा सहभाग होता परंतु यशवंतराव चव्हाणांनी राजकीय कौशल्य व मुस्दीगीरी आधारे बेरजेच्या राजकारण व बहुजनांचे राजकारण या साहाय्याने तो विरोध कमी केला. परंतु काँग्रेस पक्ष अंतर्गत मराठा जातीचे नेतृत्वा आधारे गट सुरवातीपासनच सक्रीय होते. सुरवातीच्या काळात भाऊसाहेब हिरे व यशवंतराव चव्हाण यांना माननारे दोन गट हे मराठा जातीचेच होते नंतरच्या काळात शंकरराव चव्हाण , शरद पवार, विलासराव देशमुख यांही नेत्यांनी आपला गट पक्षातर्गत सक्रिय केला होता.

परंतु नंतरच्या काळात शरद पवारांनी काँग्रेस पक्ष सोडून काँग्रेस एस स्थापन करुन पुरोगामी लोकशाही दल (पुलोद) च्या मार्फत महाराष्ट्रात राजकारण केले याही मागे मराठा जातीचे राजकीय हितसंबंध सुरक्षित ठेवणे हाच महत्वाचा उद्देश होता, पुन्हा काँग्रेस प्रवेश हा देखली हितसंबंधचा एक भाग होता. सत्ता राजकारणात काँग्रेस अंतर्गत मराठा जातीच्या गट तटाच्या राजकारणाचा फायदा नव्याने निर्माण झालेल्या राजकीय पक्षांना मिळाला यामध्ये काँग्रेस पक्षातच्या मराठा जातीच्या नेतृत्वाला सत्तेत वाटा मिळाला नाही ते पक्ष सोडून इतर


ISBN. : 978-93-84283-60-5
Scanned by CamScanner

पक्षात गेले. याचा फायदा शिवसेना व भाजप यांना झाला काँग्रेस मधील काही गट या पक्षामध्ये सामिल झाले याशिवाय या दोन्ही राजकीय पक्षांनी इतर मागास वर्ग जाती, अनुसूचित जाती व जमाती यांना राजकीय पक्षात मोठ्या संख्येने सामावून घेतले त्याचाही फायदा या राजकीय पक्षांना १९९० दशकात झाला महाराष्ट्रातील विभाग निहाय जाती ह्या राजकीय पक्षात समाविष्ट झाल्या. शिवसेना व भाजपा यांना उच्चजाती, ओ.बी.सी. जाती मधली (माधवं) माळी धनगर, वंजारी तर अनुसूचित जाती मधील काही जाती विशेषत:चर्मकार आणि अनुसूचित जमातीच्या काही जातींचा पाठींबा होता, कारण मराठा जातीच्या राजकारणापेक्षा इतर जातींना पक्षात स्थान देण्याची भूमिका शिवसेना भाजपा यांनी स्विकारली व त्याचा फायदा युती शासन येण्यात झाला.

१९९५ मध्ये शिवसेना भाजपा प्रणित युती शासन महाराष्ट्राच्या सत्तेत आले या सत्तेला सर्व जात समुहांचा पाठिंबा काही अंशी मिळाला होता. युतीने मुख्यमंत्री पदावर ब्राम्हण जातीचा मनोहर जोशी यांना सेनाप्रमुख यांच्या सांगण्यावरुन विराजमान केले होते. महाराष्ट्रात या आधी बिगर मराठा मुख्यमंत्री झाले होते परंतु त्यांना मराठा जातीचा पाठिंबा होता म्हणून ते सत्तेत आले होते. वसंतराव नाईक (बंजारा) जातीचे असून मुख्यमंत्री झाले कारण त्यांना यशवंतराव चव्हाण व त्यांचा गटाचा पाठींबा होता पण युती काळात सत्तेत असलेले जोशी यांना मुख्यमंत्री पद दिल्यामुळे मराठा जातीचे नेतृत्व नाराज होते. परंतु मराठा जातीच्या नेतृत्वाला काँग्रेस नेतृत्वाला शह देण्याची शिवसेना प्रमुखांची भूमिका त्याकाळी होती. युती सरकाच्या काळात ब्राम्हण , इतर मागासजाती, अनुसुचित जाती व जमाती यांना सत्तेत अधिक वाटा मिळाला होता व काही महत्वाची सत्तापदे देखील मिळाली होती. परंतु १९९९ नंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने पुन्हा मराठा जातीच्या राजकारणाला नवे वलय देवून राष्ट्रवादी काँग्रेस हा पर्याय उबलब्ध करुन दिला. १९९९ मध्ये काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी महाराष्ट्राच्या सत्तेत आली व मराठा जातीच्या राजकारणाला पुन्हा सत्तेच्या परिघात आणण्यास त्यांच्यात एकमत झाल्याचे दिसते. आघाडीच्या काळात सत्ताकेंद्र मराठा जातीकडे सरकल्याचे चित्र स्पष्ट दिसते. मुख्यमंत्री पद हे देखली मराठा जातीकडे स्थिर ठेवण्याचा पुरेपुर प्रयत्न झाला. सुशिलकुमार शिंदे यांना एकदा संधी मिळाली तोही केंद्रातील श्रेष्ठींच्या पाठींब्यामुळेच परंतु त्यांना असणारा विरोधातूनच नंतर राज्यपाल ते केंद्रीय मंत्री असा प्रवास घडला विलासराव देशमुख अशोक चव्हाण पृथ्वीराज चव्हाण हे काँग्रेसचे मुख्यमंत्री मराठा जातीचे होते.

१९९५ नंतर २०१४ मध्ये पुन्हा एकदा युती शासन सत्तेत आले आहे. युतीच्या काळातील सत्ताकेंद्र आज ब्राम्हण जातीकडे आहे. यामुळे महाराष्ट्रीतल प्रबळ जात मराठा दुखावली गेली. युती मधील मराठा जातीच्या गटाला सत्ताकेंद्र मराठा जातीकडे यावे यासाठी आटोकाट प्रयत्न देखील केले गेले. २०१४ ची निवडणुक हि खऱ्या अर्थाने वेगळ्या सवरुपाची होती जात ह्या घटकापेक्षा विकासाचे राजकारण, भ्रष्टाचार, माध्यमांची भूमिका, नवमतदारवर्ग, मोदी लाट घटक प्रभावशील होते. १९८० नंतरच्या दशकात महाराष्ट्राच्या राजकारणात काँग्रेस शिवसेना, भाजपा राष्ट्रवादी कँग्रेस व अलीकडील महाराष्ट्र नवनिर्माण सेना या सर्वच राजकीय पक्षात मराठा जातीचे गट कार्यरत ओहत, राजकीय सत्तेत वाटा मिळविण्याचा सतत त्यांचा प्रयत्न दृष्टीपथास येतो. सुरवातीच्या काळात काँग्रेस वर्चस्वाला असणारी मराठा जातीची वलये आता बदलत जावून प्रत्येक राजकीय पक्षात अशी एक-एक वलये निर्माण झाली आहेत. राजकारणातील पक्ष व पक्षामधली जातीचे अस्तित्व हे वेगवेगळ्या स्वरुपाचे झाले आहे. प्रत्येक राजकीय पक्षात प्रत्येक जातीचा एक गट सक्रीय आहे. त्यामुळे संपुर्ण जातीचे एक गठ्ठा मते आज कोणत्याही राजकीय पक्षाला मिळू शकत नाही त्यामुळेच आजची

ISBN. : 978-93-84283-60-5


Scanned by CamScanner

राजकीय परिस्थिती बदलत जाणारी दिसते. आज महाराष्ट्रात मुख्यमंत्री ब्राम्हण जातीचे देवेंद्र फडणवीस आहेत त्यांना भाजपातीलच नव्हे तर बहुतांशी राजकीय पक्षातील मराठा जातीचा विरोध आहे. मात्र तरीही त्यांना सत्ताकेंद्र मिळाले कारण आजची राजकीय परिस्थिती भिन्न आहे. फडणवीस यांना केंद्र व संघ यांचा पाठिंबा असल्यामुळे ते सत्तेत राहू शकतील प्रसंगी प्रबळजातीचा विरोध न जुमानता व्यवस्था चालविली जातांना दिसते जी सुरवातीच्या काळात शक्य नव्हते. ज्या मुख्यमंत्र्यांना मराठा जातीचा पाठींबा नव्हता त्यांना जास्त काळ सत्ता उपभोगता आली नाही हा महाराष्ट्राचा इतिहास आहे.

याशिवाय समकालीन महाराष्ट्राच्या राजकारणात इतर मागास जाती, अनुसूचित जाती आणि जमाती यांना केवळ निवडणुकीच्या राजकारणाचा एक भाग म्हणुन आणि आरक्षण या आधारावर वापरुन घेतले जात आहे. याची अनेक उदाहरणे या संदर्भात स्पष्ट करता येईल अगदी यशवंतराव चव्हाणांचा काळही याला अपवाद नाही (नाशिक लोकसभा पोटनिवडणुक) १९६० पासूनच विशेषत: दलित समुहांच्या राजकीय पक्षाला निवडणुकीच्या पुरता वापरुन मते घेणे ही प्रक्रिया सर्व राजकीय पक्षाकडून झालेली दिसते. या पेक्षा वाईट गोष्ट म्हणजे आजही अनुसूचित जमातींना मुख्य प्रवाहात आणणे महाराष्ट्राच्या राजकारणात शक्य झाले नाही. दलिताचे गट आज प्रत्येक राजकीय पक्षांशी संलग्न ओहत फक्त निवडणुकी पुरते सत्तेत मात्र त्यांचा स्थान नगण्य आहे हे सत्य नाकारता येत नाही.

**निष्कर्ष :**

१) महाराष्ट्राचा राजकारणात जात व राजकारण यांचा घनिष्ठ संबंध आहे. जातीच्या आधारानेचे महाराष्ट्राचे सुरवीतपासूनचे राजकारण घडत असल्याचे स्पष्ट होते.

२) मराठा हि जात महाराष्ट्रात प्रभावशाली अथवा प्रबळ जात आहे. त्यामुळेच स्थानिक ते राज्यपातळीवरील सत्तेच्या केंद्रात व परीयात याच जातीचा समावेश अधिक राहिला आहे.

३) बिगर कॉंग्रेसी सरकारचा काळात मराठा जातीला शह देवून इतर जातींना सत्तेच्या केंद्रात व परीघात आणण्याचे प्रयत्न जाणूनबुजुन झालेले आहेत. युतीच्या दोन्ही काळात तसे प्रयत्न होतांना दिसतात.

४) अनुसूचित जाती जमातींचा वापर हा फक्त सत्ता मिळवितांना निवडणुकांत केला जातो परंतु सत्ता मिळाल्यानंतर त्याचा अल्पसा वाटा देखील दिला जात नाही.

५) समकालीन राजकीय व्यवस्थेत जात घटकाबरोबरच इतर घटकाचा प्रभाव राजकारणावर अधिक असल्याचे दिसुन येते.

**संदर्भ :**

१) पळशीकर सुहास २००४, समकालीन भारतीय राजकारण पुणे, प्रतिमा प्रकाशन

२) प्रकाश बाळ, किशोर बेडकिहाक २००२, भारतीय राजकीय व्यवस्था, आंबेडकरी अकादमी सातारा.

३) पळशीकर सुहास , १९९८ जात व महाराष्ट्रतील सत्ताकारण, पुणे, सुगावा प्रकाशन

४) बोकील नीता, २०१२, महाराष्ट्राचा राजकीय इतिहास १९६०-१९७२, पुणे, मौज प्रकाशन

५) पकशीकर सुहास व नितिन बिरमल (संपा.) महाराष्ट्राचे राजकारण-राजकीय प्रक्रीयेचे स्थानिक संदर्भ, पुणे, प्रतिमा प्रकाशक.

□□□

ISBN : 978-93-84283-60-5



Scanned by CamScanner

# AY-2016-17

RAYAT SHIKSHAN SANSTHA'S

# R. B. Narayanrao Borawake College

SHRIRAMPUR, DIST. AHMEDNAGAR - 413 709, (M.S.)
(Re-accredited by NAAC with "A" grade)
(ISO : 9001:2008 certified)

ज्ञान-विज्ञान विमुक्तये



## University Grants Commission, New Delhi

Sponsored

# NATIONAL LEVEL SEMINAR

## ON

# "DEMOGRAPHIC TRENDS IN INDIA : CHALLENGES AHEAD"

**5th and 6th Oct. 2016.**




**Organized by**

**DEPARTMENT OF ECONOMICS**

**Post Graduate Teaching and Research Centre**

**R. B. NARAYANRAO BORAWAKE COLLEGE,**

**Shrirampur-413 709 (Maharashtra)**

ISBN - 978-81-932117-7-9

# INDEX



| SR. NO. | TITLE OF THE RESEARCH PAPER | AUTHOR/S | PAGE NO. |
|---|---|---|---|
| 1 | Demographic Transition in India | Dr. K. H. Shinde Mr. Pravin S. Jadhav | 1 |
| 2 | Population in India: An overview | Dr. K.H.Shinde | 7 |
| 3 | The Impact of India's Draft National Health Policy, 2015 on Indian Population | Dr. Smt. S. R. Chavan Miss. Jadhav C. B. | 11 |
| 4 | Types, Factor, Consequence of Indian Migration | Shri.Sandip BaburaoAbhang | 14 |
| 5 | Population Growth and economic development | Kotian Sowmya S. | 20 |
| 6 | Population Density | Prof. N. C. Pawar Miss. Puja Gosavi | 23 |
| 7 | Population Policy of India: 2000 | Prof. A. B. Rahane | 30 |
| 8 | India's Population Trends its Opportunity and Challenges to context SC & ST Category | Dr. Seema R.Chavan, | 35 |
| 9 | Core and Peripheries Analysis of Weaker Section: A Special Reference to Scheduled Castes Population | Mr. Sandip Sasane | 42 |
| 10 | Population Pressure on Agriculture: A Special Reference to Ahmednagar District, Maharashtra | Dr. S. P. Cholke | 46 |
| 11 | The Indian population : Real facts and remedies | Mrs. Deepali Shivram Kharat Prof. Vijay Santu Patole | 50 |
| 12 | Geographical Analysis of density and Distribution of ST Population in Ahmadnagar District | Dr. C. B. Chaudhari | 55 |
| 13 | A study of population policy in India. | Amrin Isa Patel | 63 |
| 14 | Demograohic Dividend its implication to India | Dr. B. Y. Deshmukh | 66 |
| 15 | India is set to become the youngest country | Dr.Pratap J. Phalphale | 74 |
| 16 | "Demographic Trends and its Impact on Indian Economy and Society" | Dr. Suhas Avhad Mr. Walunj G. R. | 78 |
| 17 | 'Population Policy in India' | Mrs. Khose P. N. | 81 |
| 18 | Growth of Population and its Impact on Literacy | Mrs. JadhavJyotiSahebrao, | 85 |
| 19 | Demographic Trends in India | Dr. R. G. Rasal, | 89 |
| 20 | 'Population Policy in India' | Prof. Archana Aher | 95 |
| 21 | Effects of Population Explosion on Poverty | Prof. Dr. Smt. Patil Vaishali Dhanraj, | 101 |

| SR. NO. | TITLE OF THE RESEARCH PAPER | AUTHOR/S | PAGE NO. |
|---|---|---|---|
| 22 | Population Growth Rate in Ahmednagar District | Prof. Jawale S.R<br>Prof. Kadus V D | 104 |
| 23 | 'Study of Demographic Characteristics in Nandurbar district' | Prof. Pawar Shankar S. | 108 |
| 24 | Impact of Irrigation on Population Density of Western Maharashtra: A Geographical Analysis | Dr. Kale C. N. | 113 |
| 25 | 'Indian Population Phases & Demographic Transition' | Mrs. Rahane Shobha T.<br>Dr. Kadam Promodini | 119 |
| 26 | 'Changing Characteristics of Indian Population' | Dr. Anna K. Patil | 122 |
| 27 | Impact of Population Growth on Education | Prof. Gagare A.S. | 126 |
| 28 | Impact of overpopulation on Indian Economy | Prof. Sayyed S. B.<br>Prin. Dr. L. D. Bhor | 128 |
| 29 | 'Social effects of New Media': An analysis of new media usage and its effects on the young users in Pune. | Prof. Ajit Gagare, | 132 |
| 30 | "India's Demographic Trends: its opportunities and Challenges" | Dr. S. G. Vaidya | 138 |
| 31 | Study of Population Growth and Sex Composition Trends in Ahmadnagar District | Prof. G. K. Sanap<br>Dr. R. G. Rasal | 146 |
| 32 | Linear Demand Equation by Least Square Method | Dr. P. G Andhare | 149 |
| 33 | भारतीय लोकसंख्येतील ठळक बदल व आव्हाने | प्रा.डॉ. ज्ञानदेव एकनाथ झिने | 151 |
| 34 | भारतीय लोकसंख्या वाढीमुळे , लोकसंख्या व डॉक्टर हे मानांकन राखताना वर्ष २०२० पर्यंत भारतीय अर्थव्यवस्थेवर पडणारा आर्थिक भार एक अभ्यास. | शेटे महेश तुकाराम | 155 |
| 35 | अहमदनगर जिल्ह्यातील लोकसंख्या बदलाचे मानव संसाधन विकासापुढील आव्हाने | प्रा. डॉ. सुहास आव्हाड<br>नानासाहेब चंद्रभान पवार | 159 |
| 36 | लोकसंख्या विषयक विश्लेषणाची तंत्रे | श्रीमती जोगदंड ज्योती श्रीपती | 165 |
| 37 | भारतीय लोकसंख्या व त्याचा मानवी जीवनावरहोणारा परीणाम. | महातेकर ज्ञानेश दिलीप | 171 |
| 38 | लोकसंख्या : एक दृष्टिक्षेप | श्री.गणेश रघुनाथ जैतमल | 174 |
| 39 | भारतातील लोकसंख्येची वाढ आणि वितरण | श्री. पडोळे दिगंबर जगन्नाथ | 180 |
| 40 | लोकसंख्या वाढ आणि दारिद्रय | श्री.रणदिवे अमोल अनिल | 183 |
| 41 | भारतातील लोकसंख्येचे शहरी – ग्रामीण वितरण | नळे शैलेश संजय<br>नळे पल्लवी संजय | 186 |


 ISBN: 978-81-932117-7-9

| SR. NO. | TITLE OF THE RESEARCH PAPER | AUTHOR/S | PAGE NO. |
|---|---|---|---|
| 42 | भारतीय लोकसंख्या संक्रमणाच्या विभिन्न अवस्था | आशिष सुधाकरराव निमकर, | 188 |
| 43 | लोकसंख्याषास्त्र आणि लोकसंख्याविशयक विविध संकल्पनांचा चिकित्सक अभ्यास | डॉ.सदाशिव सिताराम मेंगाळ | 193 |
| 44 | भारतातील लोकसंख्यावाढ आणि बेरोजगारी | कु.दळवी प्रतिभा ज्ञानदेव<br>कु.नवघरे माधुरी विजय | 200 |
| 45 | लोकसंख्या संक्रमण दृष्टीकोन आणि आर्थिक विकास | प्रा.डॉ.आर.जी. रसाळ<br>कु.जाधव चेतना बबनराव | 203 |
| 46 | लोकसंख्या विषयक सिद्धांत—एक दृष्टिक्षेप | श्रीमती नाईकवाडे सोनाली अशोक. | 206 |
| 47 | महाराष्ट्राची लोकसंख्या एक दृष्टिक्षेप | निकम पुनम नरेंद्र | 210 |
| 48 | मानवी बर्तनाच्या न्यासिकरणावर जनपदाचा प्रभाव:मानसशास्त्रीय संशोधनात्मक दृष्टिकोन | डॉ. गणेश विष्णू लोखंडे | 215 |
| 49 | भारतीय लोकसंख्येची वाढती प्रवृत्ती आणि भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील आव्हाने | शेळके सागर मच्छिंद्रनाथ | 221 |
| 50 | लोकसंख्या आर्थिक विकासातील एक घटक | गव्हाणे दत्तात्रय धनू | 225 |
| 51 | लोकसंख्या आणि बेकारी | कु.बारहाते अंकिता सोमनाथ | 229 |
| 52 | लोकसंख्या वाढीचे आर्थिक विकासावरील परिणाम | प्रा. श्रीमती काळे एस. आर | 232 |
| 53 | लोकसंख्या वाढ विषयक सिद्धांत: एक दृष्टिक्षेप अभ्यास २०१६—१७ | राहिंज रेणूका शिवाजी | 238 |
| 54 | राज्याची निर्मिती व लोकसंख्या यांच्यातील बदलता सहसंबंध: एक राज्यशास्त्रीय विश्लेषण. | प्रा. तोंडे बाबासाहेब सखाराम | 241 |
| 55 | भारतातील अतिरिक्त लोकसंख्या—समस्या व उपाय | प्रा.एम.जी.थोपटे | 246 |
| 56 | भारतातील लोकसंख्येचे स्थलांतर | हरदास माधवी बाळासाहेब | 249 |
| 57 | भारतीय लोकसंख्या धोरण भारतीय | वाकचौरे बी. एस. | 253 |
| 58 | लोकसंख्येतील ठळक बदल व आव्हाने. | श्रीमती.बनकर आशा भिमा | 256 |
| 59 | लोकसंख्यावाढ आणि आर्थिक विकास | श्रीमती डांगे शितल वसंत | 261 |
| 60 | लेकसंख्या वाढीमुळे झालेले शहरीकरण | बोरगे अर्चना उत्तम<br>बोरगे [illegible] उत्तम | 264 |


 ISBN: 978-81-932117-7-9

# ''लोकसंख्या आर्थिक विकासातील एक घटक''

गव्हाणे दत्तात्रय धनू

मो .9270787685

(dattadg.2007@gmail.com)

**प्रस्तावना :-**लोकसंख्या हि एक साधन संपदा आहे. साधनसंपदा विपुल प्रमाणात असणे हे आर्थिक सुबत्तेचे लक्षण आहे. मात्र भारतासारख्या देशात लोकसंख्येबाबत वेगळा मतप्रवाह बघावयास मिळतो. भारतीय लोकसंख्या जास्त असल्यामुळे आर्थिक विकासाचा वेग मंद झाला असल्याचे असल्याचे निष्कर्ष समोर येत आहे. मात्र भारताची लोकसंख्या खरोखरच अतिरीक्त आहे काय ? लोकसंख्या आर्थिक विकासातील अडथळाच आहे काय ? आर्थिक विकास साध्य करण्यासाठी देशाची लोकसंख्या जास्त नसणे गरजेचेच आहे काय ? या व अशा अनेक प्रश्नांचा शोध घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधनिबंधात केलेला आहे.

**शोधनिबंधाचा उद्देश :-**

1. लोकसंख्या वृध्दीचा अभ्यास करणे.
2. आर्थिक विकासातील लोकसंख्येचे महत्व शोधणे.
3. लोकसंख्येची गुणवत्ता तपासणे.
4. गुणवत्ता वाढीसाठी उपाययोजना सुचविणे.

**गृहितके :-**

1. लोकसंख्या आर्थिक विकासातिल महत्वपुर्ण घटक आहे.
2. आर्थिक विकास व लोकसंख्या यांच्यात धन सहसबंध आहे.

**संशोधन प्रणाली :-**प्रस्तुत शोधनिबंधासाठी माहिती संकलनाच्या दुय्यम स्त्रोतांचा आधार घेतलेला आहे. विकसित व अविकसित देशांच्या लोकसंख्येचा व लोकसंख्याविषयक वैशिष्ट्यांचा अभ्यास विचारात घेतला आहे. विविध लेख, पुस्तके, इंटरनेटवरील लेख, इ. चा आधारसामग्री म्हणुन वापर केलेला आहे.

**स्पष्टीकरण :-**भारतात दर 10 वर्षांनी जनगणना केली जाते.1921 हे वर्ष वगळता देशाची लोकसंख्या वाढत आहे. त्यातील वृध्दीची प्रवृत्ती पुढिलप्रमाणे :-

| अ.नं. | जनगणना वर्ष | लोकसंख्येत होणारी निव्वळ वाढ | वृध्दीचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1. | 1921 | -7,72,177 | -0.31% |
| 2. | 1931 | 2,76,56,025 | 11% |
| 3. | 1941 | 3,96,83,342 | 14.22% |
| 4. | 1951 | 4,24,27,510 | 13.31% |
| 5. | 1961 | 7,81,46,681 | 21.64% |
| 6. | 1971 | 10,89,24,881 | 24.80% |
| 7. | 1981 | 13,51,69,445 | 24.66% |

| | | | |
|---|---|---|---|
| 8. | 1991 | 16,30,91,942 | 23.87% |
| 9. | 2001 | 18,23,16,397 | 21.54% |
| 10. | 2011 | 18,21,17,541 | 17.70% |

स्त्रोत : भारतीय अर्थव्यवस्था : प्रतियोगीता दर्पण (अतिरीक्तांक)

1921 ला 25,13,21,213 इतकी असणारी लोकसंख्या 2011ला 121,08,54,977 इतकी वाढली. जगात लोकसंख्येच्या बाबतीत चीननंतर भारतचा दुसरा क्रमांक लागतो. चीनची लोकसंख्या सर्वाधिक असुनही चीनने आपला विकास साध्य केलेला आहे. यावरुन लोकसंख्या आर्थिक विकासास सहाय्यभुत असते असे सिध्द होते. भारताता साक्षरतेच्या बाबतीतही मोठी वाढ झाल्याचे दिसून येते.1951 ला साक्षरतेच प्रमाण 18.33 टक्के इतके अल्प होते. त्यातही महिलांच्या साक्षरतेचे प्रमाण अगदी नगण्य म्हणजेच फक्त 8.86 टक्के इतके होते. आज हेच प्रमाण आशादायक बनत चालले आहे. 2011 च्या जनगणेनुसार 73 टक्के साक्षरतेचे प्रमाण आहे त्यात पुरुष साक्षरता 80.9 टक्के तर महिला साक्षरता 64.6 टक्के इतकी आहे. यावरुन भविष्यात मानवी साधनसामग्रीत भरघोस वाढ होऊन आर्थिक विकासाला मोठा हातभार लागु शकेल. बऱ्याचशा विकसित देशाचा विचार करता त्यांनी आपली लोकसंख्या वाढविण्यासाठी प्रयत्न केल्याचे दिसून येते.

**लोकसंख्या आर्थिक विकासासाठी सहाय्यक असते या समर्थनार्थ मुद्दे पुढिलप्रमाणे :-**

1. **नैसर्गिक साधन संपदेच्या पुर्ण वापरासाठी :-**देशात उपलब्ध असणारी नैसर्गिक साधनसंपदा व लोकसंख्या यांचे प्रमाण पर्याप्त असले पाहिजे. साधनसंपदा वापराविना पडून राहत असेल तर देशाला आर्थिक विकास साध्य करता येत नाही. ज्या देशाची लोकसंख्या कमी आहे अशा देशांच्या बाबतीत या नैसर्गिक साधनसंपदचा वापर करुन घेण्यासाठी मानवी संपदेत वाढ करण्याकडे विशेष लक्ष दिले जात आहे.
2. **संशोधन कार्यासाठी :-** आजच्या गतीमान जगात संशोधनाला खुप महत्व प्राप्त झालेले आहे. जो देश संशोधनात विशेष प्रगती करेल तोच देश आर्थिक विकास साध्य करु शकेल. देशातील लोकांसाठी तसेच निर्यासाठीही संशोधन वरदान ठरत असते. बौध्दिक संपदेच्या मार्फत जगावर राज्य करता येईल. मात्र त्यासाठी लोकसंख्येची संशोधनकार्यासाठी रुची असणे आवश्यक आहे. भारतीय लोक संशोधनात मागे नाहीत. अमेरीकेतील ज्या क्रोमाक रिसर्चइंक कंपनीने कडुलिंब, बासमती तांदुळ व हळद याची पेटंट पळवली होता व आता गोमुत्र व इतर भारतीय औषधीचे पेटंटसाठी अर्ज केलेला आहे त्यात उच्चपदस्थ शास्त्रज्ञ भारतीय आहे. त्याच्या सल्ल्यानेच हि कंपनी पेटंट पळविण्याचा प्रयत्न करीत आहे.
3. **प्रभावी मागणीच्या वाढीसाठी :-** अर्थव्यवस्थेला गती प्राप्त होण्यासाठी प्रभावी मागणीची फार गरज असते. आज विकसित देश त्यांची उत्पादने विकण्यासाठी भारतीय बाजारपेठेची निवड करतात. कारण भारतात अतिरीक्त लोकसंख्येमुळे प्रभावी मागणी आपोआप जास्त आहे. मात्र त्याचा फायदा विदेशी उद्योजक घेत आहेत.
4. **सेवा क्षेत्राच्या अधिक विकासासाठी :-**भारतासारख्या देशात BPO कंपन्या मोठ्या प्रमाणात येत आहेत. त्यामुळे भारताला मोठ्या प्रमाणात परकिय चलन प्राप्त होत आहे. भविष्यात LPO (वकिली

सेवा) तसेच तत्सम सेवा निर्यात करण्याची मोठी संधी आपल्याला आहे. त्यामुळे जेवढी लोकसंख्या अधिक-तितका सेवा व्यापार वाढण्यास मदत होणार आहे.

5. **बचत आणि गुंतवणुकित वाढ होण्यासाठी :-** देशाच्या विकासासाठी भांडवलाची गरज असते. बचत जेवढी जास्त तेवढे गुंतवणुकीसाठी दुसऱ्या देशावर असलेले अवलंबीत्व कमी करता येते. जास्तीच्या लोकसंख्येला अल्प बचतीची सवय लागली तरी देशाच्या एकुण स्वदेशी गुंतवणुकीत मोठ्या प्रमाणात वाढ होईल. गुंतवणुक स्वदेशी असेल तर ती काढुन घेतल्याने आर्थिक नुकसान होत नाही. विदेशी गुंतवणुक नेमकी अडचणीच्या वेळेस काढून घेतली जाते व त्याचा विकासावर विपरीत परीणाम होतो.

**लोकसंख्येबाबत भारतातील सद्यस्थिती :**

भारत 2020 मध्ये महासत्ता होण्याची स्वप्न बघतो आहे. भारताचे राष्ट्रपती यांनी व्हिजन 2020 च्या यशस्वीतेसाठी देशातील लोकसंख्याच विचारात घेतली आहे. सध्या भारत हा ''तरुण भारत '' आहे. आज देशातील 15ते 60 वयोगटातील लोकसंख्येचे प्रमाण 60.29 टक्के इतके आहे म्हणजेच जास्तीत जास्त लोकसंख्या तरुण आहे. अशी स्थिती मानवाच्या आणि देशाच्या आयुष्यात एकदाच येत असते. म्हणुन या तरुण लोकांच्या हातुनच आपण महासत्ता होऊ शकतो.

मात्र भारतात बहुसंख्य लोकांच्या हाताला काम नसल्यामुळे लोकसंख्येचा वापर विधायक कामासाठी करुन घेता येत नसल्याने लोकसंख्या अडथळा असल्यासारखे वाटते. देशाच्या लोकसंख्येला आर्थिक विकासातील एक पोषक घटक बानवायचे असेल तर पुढिल उपाययोजना कराव्या लागतील .

**लोकसंख्या आर्थिक विकासातील एक पोषक घटक बनण्यासाठीच्या उपाययोजना :-**

1. **साक्षरतेत वाढ करणे :** लोकसंख्या जोपर्यंत साक्षर होत नाही तोपर्यंत ती आर्थिक विकासाचा हिस्सा होऊ शकत नाही. भारतात 2011 च्या जानगणेनुसार 84.04 टक्के इतकी आहे. देशात 100 टक्के साक्षरता निर्माण केली पाहिजे.
2. **लोकसंख्येच्या गुणवत्तेत सुधारणा करणे :-** मानवी विकास निर्देशांकामार्फत गुणवत्ता मोजली जाते. मानवी विकास निर्देशांकात भारताचा क्रमांक 130 वा आहे. म्हणजेज अजुन लोकसंख्येचा मोठा भाग शिक्षण, सरासरी आर्युमान, राहणीमानाचा स्तर, आरोग्य अशा मुलभूत सुविधांपासून वंचित आहे. त्यांना या सुविधांचा लाभ मिळाला तर देशातील लोकांची गुणवत्ता सुधारण्यास मदत होईल.
3. **अनैच्छिक बेकारी नाहिसी करणे :-** देशातील ऐच्छिक बेकार वगळता इतर सर्व लोकांना त्याच्या पात्रतेप्रमाणे काम मिळाले पाहिजे. देशातील बेरोजगारी नष्ट करता आली तर दारिद्र्य व इतर समस्यांचे आपोआप निराकरण करणे शक्य होईल. सरकारने मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती केली पाहिजे.
4. **पडुन असलेल्या नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर करणे :-** देशातील लोकांना रोजगार पुरविणे सरकारला सहज शक्य आहे. भारतात मोठ्या प्रमाणात नैसर्गिक साधनसंपदा पडून आहे. मानवी साधनसंपदेचा वापर करुन पडुन असलेली नैसर्गिक संपदेचा वापर सुरु केला तर मोठ्या प्रमाणात उत्पादन वाढ होईल.

5. **मानवी संसाधन विकासाकडे अधिक लक्ष देणे :-** मानवी साधनसंपत्तीच्या विकासाकडे काळजीपुर्वक लक्ष सरकारने दिल्यास संपुर्ण लोकसंख्या आर्थिक विकासात मदतनिस होईल.
6. **शिक्षण पध्दतीत सुधारणा करणे :-** अस्तित्वात असलेली शिक्षणपध्दत सदोष आहे. सरकारच्या शैक्षणिक धोरण व शिक्षण पध्दती यांत काळानुरुप बदल होणे गरजेचे आहे. नैतिक व व्यावसायिक शिक्षणाची योग्य ती सांगड घालून शिक्षणाने एक आदर्श नागरीक व त्याला रोजगार मिळविण्यास किंवा उपजिविकेस पात्र करता आले पाहिजे. सध्या व्यावसायीक शिक्षण घेणाऱ्यांना निती, मुल्ये शिकविली जात नाही व पारंपारीक शिक्षण घेणाऱ्यांना उपजिविका भागविता येत नाही.
7. **बौध्दिक संपदा अधिकारांचा लाभ मिळवून देणे :-** देशातील जनतेला पेटंट सारख्या कायद्यानुसार उत्पादनाचे व प्रक्रियांचे हक्क प्राप्त करुन दिला पाहिजे. बौध्दिक संपदा अधिकाराची माहिती जनतेला करुन देणे गरजेचे आहे. त्यामुळे पेटंट चोरी होणार नाही व भारतीय संशोधकांना फायदा होईल. स्टार्ट अप इंडिया सारख्या योजना स्वागतार्ह आहेत.
8. **सरकारी पातळीवरुन प्रयत्न करणे :-** देशातील लोकांची गुणवत्ता, राहणीमान, शैक्षणिक दर्जा इ. मध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी सरकारी पातळीवरुन प्रयत्न होणे गरजेचे आहे. राजकिय, प्रशाकिय यंत्रणांनी याबाबतीत मुळापासून प्रयत्न करणे गरजेचे आहे.
9. **सेवा क्षेत्राचा विकास करणे :-** सेवा उद्योगांचा विकास केल्यास बहुसंख्य विकसित व विकसनशिल देशांना सेवा पुरविण्याचे काम भारताकडून होऊ शकते. तेवढी मानवी शक्ती आपल्याकडे आहे.

**गृहितकृत्य पडताळणी :-**

1. गृहित क्र. 1 वरील हे वरील विश्लेषणावरुन सिध्द होते.
2. गृहित क्र.2 हे तेव्हाच सिध्द होईल जेव्हा संपुर्ण लोकसंख्या साक्षर असेल आणि प्रत्येकाला काम उपलब्ध असेल. वर सुचविलेल्या उपाययोजना केल्यास सदर गृहित सिध्द होउ शकेल.

**संदर्भसुची :-**


1. दत्त गौरव व महाजन अश्विनी, "भारतीय अर्थव्यवस्था", 48 वी आवृत्ती 2011, एस. चंद पब्लिकेशन, दिल्ली.
2. रारावीकर यशवंत व अन्य, "डायमंड अर्थशास्त्रकोश" 2008, डायमंड पब्लिकेशन, पुणे.
3. विघ्नराजा गणेश, "लोकसंख्या संमिश्र वरदान", 29 सप्टेंबर 2011, दैनिक सकाळ, पुणे.
4. दातीर आर.के. व अन्य, "भारतीय अर्थव्यवस्था :समस्या आणि भवितव्य", 2013, निराली प्रकाशन, पुणे.
5. आशियाई बँक रिपोर्ट.
6. दैनिक लोकसत्ता, महाराष्ट्र टाईम्स.
7. *www.economist.com*



ADMINISTRATIVE BULIDNG

## About the College

The college was established in June 1960. It is one of the leading branches in higher education of 43 colleges of Rayat Shikshan Sanstha, Satara, affiliated to the Savitribai Phule Pune University ,Pune, in rural India providing quality education to masses. The college is celebrating Golden Jubilee year up to this golden moment, college has achieved number of mile stones such as

- Best College Award of S. P. Pune University, Pune 2007- 08
- Rayat Mauli Award of Rayat Shikshan Sanstha 2007- 08
- Best Principal Award of S.P. Pune University, Pune 2008 – 09
- NAAC Re-accredited 'A' Grade-2012
- ISO: 9001-2008 (2012)
- Karmveer Award : 2012 -13
- The college runs 16 under graduate, 9 Post Graduate and 4Research Programmes.



FACULTY OF ARTS AND HUMANITIES BUILDING

## Department of Economics at a Glance

elevant Economic issues

The Department of Economics was Economics was established in the year 1963. It imparts UG (1963) and PG (1970) level programme along with M. Phil. Research Center- 2007/ Ph. D.-2016. It is leading department of college with around 500 student on it roll and 5 qualified faculty, The department is providing two short term Courses 1) Self help group and Banking Practices 2)Tax consultancy Beside the regular degree courses. The department has been organizing various academic activities regularly in order to develop research culture among the learning community. It has also been instrumental in providing platform for discussion and debates on current and relevant Economic issues

Rayat Shikshan Sanstha's
R. B. NARAYANRAO BORAWAKE COLLEGE,
Shrirampur-413 709 (Maharashtra)
Ph. No. (02422) 222347 website: www.rbnbcollege.com
E-mail: rbnbcollege@gmail.com

AY-2017-18

UGC Approved Sr. No. 49366

SRJIS

Online ISSN -2278-8808
Printed ISSN- 2349-4766

GLOBALLY INDEXED
IMPACT FACTOR
SJIF 2016
6.177




An International
Peer Reviewed

Referred
Quarterly

# SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

OCT-DEC , 2017. VOL. 6, ISSUE -34

5

EDITOR IN CHIEF : YASHPAL D. NETRAGAONKAR, Ph.D.

SJIF 2016 = 6.177

**Online ISSN 2278-8808** **Printed ISSN 2349-4766**

An International, Peer Reviewed, & Referred Quarterly

# Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

**OCT-DEC, 2017, VOL-6, ISSUE-34**

266 भारतीय शेतीची आधुनिकता आणि सद्यस्थिती
*प्रा. डॉ. कदम प्रमोदिनी विठ्ठल (1173-1181)*

267 मानव संसाधन व्यवस्थापन :– श्रमशक्तीचा आदर्श स्त्रोत
*डॉ. डी.एस. पाटील (1182-1188)*

268 भारतातील कृषि क्षेत्र आणि कर्जपुरवठा
*प्रा.डॉ. अरुण तवार & प्रा.डॉ. शिवाजी पाते (1189-1192)*

269 औद्योगिक विकासात खाजगी क्षेत्राचे योगदान
*प्रा. डॉ. आर. डी. भोसले (1193-1196)*

270 भारतीय शेतीसमोरील आव्हाने आणि शेती विकास
*प्रा. डॉ. कृष्णा शंकर शहाणे (1197-1202)*

271 मानव विकास निर्देशांक व भारतीय मुस्लिम समाज– अहमदनगर जिल्ह्यातील श्रीरामपूर तालुक्यातील शहरी भागाचा एक व्यष्टी अध्ययन
*प्रा. डॉ. विजयकुमार वावळे, शायिन यासिन शेख (1203-1209)*

272 भारतीय अर्थव्यवस्था आणि नोटबंदी एक अभ्यास
*अनंत श्रीराम राठोड (1210-1213)*

273 वस्तू व सेवा करांचा लघू व मध्यम उद्योगांवर पडणारा प्रभाव
*प्रा. डॉ. सावंत रजनी नामदेवराव (1214-1216)*

274 कातकरींचा सामाजिक दृष्टीकोन : एक अभ्यास
*डॉ. आर. के. दातीर & श्री. विनायक तु. खातळे (1217-1220)*

275 भारताचे विदेश व्यापार धोरण : निर्यात वद्धीतील प्रमुख अडथळा ?
*प्रा. डी. डी.गव्हाणे & प्रा. डॉ. एस. बी. वैद्य (1221-1226)*

276 अहमदनगर जिल्ह्यातील नगरपालिकांच्या महिला व बालकल्याण विभागाच्या योजनांचा चिकित्सक अभ्यास
*संगिता रामेश्वरलाल जांगीड & प्रा.डॉ.ए.एम.पवार (1227-1229)*

प्रा. डी. डी.गव्हाणे & प्रा. डॉ. एस. जी. वैद्य (1221-1226)

# भारताचे विदेश व्यापार धोरण : निर्यात वद्धीतील प्रमुख अडथळा ?

**प्रा. डी.डी.गव्हाणे & प्रा. डॉ. एस.जी.वैद्य**
*कला व वाणिज्य महाविद्यालय, वडनेरभैरव जि. नाशिक, महाराष्ट्*
*आर.बी.एन.बी. कॉलेज. श्रीरामपूर जि. अहमदनगर, महाराष्ट्*

भारत हा कृषीप्रधान व विकसनशिल देश आहे. भारतातच्या व्यवहारतोलात सातत्याने तुट निर्माण होत आहे. जागतिकीकरणाचा स्विकार केल्यांनतर व्यापारातील तुटित मोठी वाढ होत आहे. विदेशी व्यापार धोरणांमुळे देशात आयात होणाऱ्या वस्तु सेवांच्या प्रमाणात वाढ झाली मात्र देशातून निर्यात होणाऱ्या वस्तुंची अपेक्षित वाढ होऊ शकली नाही. भारतीय अर्थव्यवस्थेने जागतिक वस्तुसाठी स्वदेशी बाजारपेठेत अमुलाग्र स्वरुपाचे बदल केले. जागतिकीकरण, उदारीकरण, खाजगीकरण, आयात जकातीत सवलती, प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक, फेमा (FEMA) अशा नवनविन व्यापारी धोरणांमुळे आयातीच्या संख्येत व मुल्यात मोठी वाढ झालेली दिसून येते. मात्र कृषीप्रधान भारतातील शेतमालाला परकीय बाजार मिळण्यासाठी प्रत्येक विदेश व्यापार धोरणात ठोस निर्णय झालेला दिसून येत नाही. परिणामी शेतमालाची निर्यात कमी राहिल्याने व्यापारतुटित वाढ होत राहिली. देशातील गरीब शेतकरी आपल्या शेतमालाची उत्पादनखर्चाइतकी किंमत न मिळाल्याने आत्महत्या करीत आहे. देशाची व्यापार धोरणे हे देशाच्या परिस्थितीला अनुरुप ठरणारी असली पाहिजे. त्यांमुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठांचा लाभ देशातील अस्तित्वात असलेल्या उद्योगव्यवसायांना होऊन निर्यातवद्धीचे उद्दिष्ट साध्य करता येते. भारताला महासत्ता होण्यासाठी जागतिक व्यापारातील आपला हिस्सा वाढविणे अत्यंत गरजेची बाब आहे. परकिय भांडवलावर उद्योग व सेवा क्षेत्राचा विकास करुन भारत महासत्ता होऊ शकणार नाही. त्यासाठी स्वसामर्थ्यावर उभ्या असणाऱ्या शेती क्षेत्राकडे कानाडोळा न करता त्यातुनच निर्यातवृद्धी साध्य करता आली तर देशाला महासत्ता होण्यापासून कोणताही देश थांबवू शकत नाही.

**शोधनिबंधाचा उद्दिष्टये :-**

१. व्यापार धोरणांचा अभ्यास करणे.

२. व्यापार धोरणांमध्ये आयात व निर्यातविषयक तरतुदि जाणून घेणे.

३. व्यापारतोलाचा प्रवत्तीचा अभ्यास करणे.

४. निर्यात वृद्धितील अडथळ्यांचा शोध घेणे.

५. निर्यातवाढीसाठी उपाय सुचविणे.

**गृहितके :-**

१. नविन आर्थिक धोरणाचा अवलंब केल्यापासुन भारताच्या व्यापारतोलातील तुट वाढत आहे.

२. देशांतर्गत व परकिय धोरणांमुळे निर्यात वृद्धित अडथळे निर्माण होत आहे.

३. भारतातील शेतमाल निर्यात वृद्धिला मोठा वाव आहे.

**१९९१ नंतरची भारतातील आयात -निर्यात**

(आकडे दशलक्ष डॉलर मध्ये)

| वर्ष | निर्यात | | आयात | | व्यापारतोल |
|---|---|---|---|---|---|
| | मुल्य | वृद्धिदर | मुल्य | वृद्धिदर | |
| १९९१-९२ | १७८६५ | -- | १९४११ | -- | -१५४६ |
| १९९२-९३ | १८५३७ | ३.७६ | २१८८२ | १२.७३ | -३३४५ |
| १९९३-९४ | २२२३८ | १९.९७ | २३३०६ | ६.५१ | -१०६८ |
| १९९४-९५ | २६३३० | १८.४० | २८६५४ | २२.९५ | -२३२४ |
| १९९५-९६ | ३१७९७ | २०.७६ | ३६६७८ | २८.०० | -४८८१ |
| १९९६-९७ | ३३४७० | ५.२६ | ३९१३३ | ६.६९ | -५६६३ |
| १९९७-९८ | ३५००६ | ४.५९ | ४१४८४ | ६.०१ | -६४७८ |
| १९९८-९९ | ३३२१८ | -५.११ | ४२३८९ | २.१८ | -९१७१ |
| १९९९-२००० | ३६८२२ | १०.८५ | ४९६७१ | १७.१८ | -१२८४९ |
| २०००-०१ | ४४५६० | २१.०१ | ५०५३६ | १.७४ | -५९७६ |
| २००१-०२ | ४३८२७ | -१.६४ | ५१४१३ | १.७४ | -७५८६ |
| २००२-०३ | ५२७१९ | २०.२९ | ६१४१२ | १९.४५ | -८६९३ |
| २००३-०४ | ६३८४३ | २१.१० | ७८१५० | २७.२६ | -१४३०७ |
| २००४-०५ | ८३५३५ | ३०.८४ | १११५१६ | ४२.६९ | -२७९८१ |
| २००५-०६ | १०३०९२ | २३.४१ | १४९१६७ | ३३.७६ | -४६०७५ |
| २००६-०७ | १२६४१४ | २२.६२ | १८५७३५ | २४.५१ | -५९३२१ |
| २००७-०८ | १६३१३२ | २९.०५ | २५१६५४ | ३५.४९ | -८८५२२ |
| २००८-०९ | १८५२९५ | १३.५९ | ३०३६९६ | २०.६८ | -११८४०१ |
| २००९-१० | १७८७५१ | -३.५३ | २८८३७३ | -५.०५ | -१०९६२२ |
| २०१०-११ | १५११३६ | -१५.४५ | ३६९७६९ | २८.२३ | -२१८६३३ |
| २०११-१२ | ३०४६२४ | १०१.५६ | ४८९१८१ | ३२.२९ | -१८४५५७ |
| **सांख्यिकीय सरासरी** | **८३६२९.१०** | **१७.०७** | **१२८२४८.१०** | **१८.२५** | **-४४६१९** |

Source : http://commerce.gov.in

वरील आकडेवारीवरुन असे स्पष्ट येते की, १९९१-९२ या वर्षी आयात १९४११ दशलक्ष डॉलर तर निर्यात १७८६५ दशलक्ष डॉलर इतकी होती. याच काळात व्यापार तुट फक्त १५४६ दशलक्ष डॉलर इतकी होती. सन २०११-१२ मध्ये निर्यातीत वाढ होऊन ती ३०४६२४ दशलक्ष डॉलर इतकी झाली तर आयातीतसुद्धा वाढ होऊन ती ४८९१८१ दशलक्ष डॉलर इतकी झाली. या वर्षी व्यापार तुट १८४५५७ दशलक्ष डॉलर इतकी

राहीली. वर्षे १९९२-९३ ते २०११-१२ या कालावधीचा विचार करता निर्यातवृद्धीच्या दरात मोठे चढ उतार पहायला मिळतात. १९९८-९९, २००१-०२,२००९-१० व २०१०-११ या वर्षात निर्यातीत ऋणात्मक वृद्धि दिसून येते. आयातीचा विचार करता फक्त २००९-१० या वर्षी आयातीत ऋणात्मक बदल दिसून येतात. बाकी इतर सर्वे वर्षात आयातीत वाढ झाल्याचेच दिसून येते. अभ्यासकाळात देशाची सरासरी निर्यात ८३६२९.१० दशलक्ष डॉलर इतकी राहिली तर आयात १२८२४८.१० दशलक्ष डॉलर इतकी राहिलेली दिसून येते. निर्यातीपेक्षा सरासरी आयात जास्त राहिल्याने व्यापारतुट प्रतिवर्षी सरासरी ४४६१९ दशलक्ष डॉलर इतकी राहीली.

**व्यापार तुट निर्माण होण्याची कारणे :-**

**अ) निर्यात कमी असण्याची कारणे :-**

**१. कृषी क्षेत्राचा जास्त विस्तार :-**भारतात जास्तीत जास्त लोकसख्या शेतीवर अवलंबुन असल्याने निर्यातीमध्ये शेती क्षेत्राचे प्राबल्य दिसुन येते. त्यामुळे या क्षेत्रातुन जास्त निर्यात होत असली तरी एकुण मुल्य मात्र कमी राहते. तसेच शेती या क्षेत्रात प्रचंड अनिश्चितता असल्याने उत्पादनात मोठ्या प्रमाणात चढ उतार होत असतात. त्याचा परीणाम निर्यात घटण्यावर होत असतो.

**२.अभ्यासरहित विदेश व्यापार धोरण :-**भारताच्या विदेश व्यापार धोरणात अभ्यासाचा अभाव दिसून येतो. देशातील ज्या शेतमालाला परदेशी बाजारपेठेत मोठी मागणी असतांना केवळ राजकिय स्वार्थापोटी अशा शेतमालाच्या निर्यातील प्रोत्साहन देण्याऐवजी निर्यात शुल्क आकारले जाते. परिणामी त्या वस्तुंची निर्यात बंद होऊन उलट आयात वाढते. उदा. भारतीय कांद्याला विदेशी बाजारपेठेत मोठी मागणी आहे. मात्र त्यावर प्रतीटन १४०० डॉलरपर्यंत निर्यात शुल्क आकारले गेले होते. २०१७-१८ या वर्षातही त्यावर ८५० डॉलर निर्यातशुल्क आकारले गेले आहे.

**३. औद्योगीक उत्पादने परकीय बाजारपेठेत टिकत नाही :-**भारतीय अर्थव्यवस्था ही विकसनशिल आहे. बरेच नविन उद्योग स्थापन होत आहे. अशा उद्योगातील उत्पादन हे विशेषता दर्जा बाबत परकीय बाजारपेठेत टिकत नाही. त्यामुळे उद्योगांचा विकास खुंटतो व निर्यात कमी राहते.

**४. देशांतर्गत भाववाढ :-**सध्या जिवनावश्यक वस्तु व इतर बाबतीत मोठ्या प्रमाणात भाववाढ झालेली दिसुन येते. भाववाढीमुळे सर्व उत्पादने देशांतर्गत बाजारपेठेतच विक्री केली जातात.तसेच इतर देशही त्यांची उत्पादने भारतीय बाजारपेठेत विक्रीस आनतात. त्यामुळे निर्यात कमी राहुन आयात वाढते व तुट वाढत जाते.

**५. वाढावा कमी :**भारताची लोकसंख्या प्रचंड असल्याने देशातील जवळ - जवळ सर्व उत्पादन देशातच उपभोगले जाते. भारत हे कल्याणकारी राष्ट्र असल्याने देशातील उपभोगाला सर्वोच्च स्थान देण्यात आले आहे. त्यामुळे देशांतर्गत उपभोग कमी करुन अल्प उत्पादन निर्यातीसाठी शिल्लक राहते. त्यामुळे निर्यात कमी राहुन व्यापारतोलातील तुट वाढते.

**६. WTO मधिल तरतुदी :-**जागतीक व्यापार संघटनेने व्यापारामध्ये शेती क्षेत्राचा समवेश केला. त्यामुळे भारतीय शेतीवर त्याचे विपरीत परीणाम झाले. बौद्धीक संपदा हक्कामुळे भारतीय उद्योगांना उत्पादन वाढविण्यासाठी जाचक बंधने या करारामुळे आली. याउलट विकसित देशांनी मात्र व्यापार संघटनेच्या तरतुदीची अंमलबजावणी केली नाही. तसेच त्यास छुपा विरोध केला. उदा. आरोग्यास अपायकारक या नावाखाली विकसित देश भारतासारख्या देशाकडुन होणाऱ्या आयातीवर बंधने लादतात. त्यामुळे निर्यात घटते.

**७. कालबाह्य उत्पादन तंत्राचा अवलंब :-**भारतीय अर्थव्यवस्था विकसनशिल असल्याने आपल्याला नविन उत्पादन तंत्रासाठी परकीय देशांवर अवलंबुन रहावे लागते. परकीय(विकसित) देश मात्र त्यांच्यालडे कालबाह्य झालेले तंत्रज्ञान महागड्या किमतीला विकतात. त्या तंत्राद्वारे केले जाणारे उत्पादन कमी दर्जाचे असतेच शिवाय त्यासाठी लागणारा खर्चही जास्त येतो. त्यामुळे असे उत्पादन परकिय बाजारपेठेत कमी किमतीस विकणे शक्य न झाल्याने निर्यातीत वाढ होत नाही.

**ब ) आयात जास्त असण्याची कारणे :-**

**१. लोकसंख्या वाढ :-**भारताची लोकसंख्या जास्त असुन तीचा वाढीचा वेगही जास्त आहे. एवढी मोठी लोकसंख्या असलेल्या देशाचा उपभोगही प्रचंड आहे. देशांतील उत्पादन त्यापेक्षा कमी पडते. त्यामुळे मोठ्या प्रमाणात आयात परावलंबीत्व निर्माण होते. हरितक्रांतीपुर्वि PL४८० कराख्दारे अमेरीकेतुन अन्नधान्याची आयात करावी लागली होती. हरित क्रांती होउनही आज परत आपल्याला अन्नधान्य टंचाईला सामोरे जावे लागत आहे. म्हणुन आज दुसऱ्या हरित क्रांतीची गरज आहे. या वाढत्या लोकसंख्यमुळे विदेशातुन फार मोठ्या प्रमाणात वस्तु भारतीय बाजारपेठेत येत आहे. परकियांच्या दृष्टीने भारत एक मोठी बाजारपेठ आहे. त्यामुळे आपली आयात वाढत आहे.

**२. भाववाढ विरोधी आयात :-**''भाववाढ म्हणजे कमी वस्तुंचा जास्त पैशाने केलेला पाठलाग ''. म्हणुन भाववाढीची परीस्थिती असेल तर ती अर्थव्यवस्थेसाठी हानीकारक असते. त्यामुळे सरकार वेळीच उपाय योजते व अशा वस्तुंची परदेशांतुन आयात केली जाते. त्यास भाववाढविरोधी आयात असे म्हणतात. व्यापारचक्रांमुळे ही परीस्थिती वारंवार उद्धवत असल्याने आयात जास्त राहुन व्यापारतोलातील तुट वाढत जाते.

**३. विकास परीपोषक आयात :-**भारताला १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाले. त्यानंतर विकासाचे पर्व सुरु झाले. ज्या वस्तुचे उत्पादन करणे आपल्या कुवतीबाहेर आहे असेही उत्पादन आपण सुरु केले. मात्र त्यासाठी आपल्याला खुप मोठ्या प्रमाणात आयात करावी लागली. त्यास विकास परीपोषक आयात असे म्हणतात. अशी आयात करुन आपली उत्पादन क्षमता वाढविणे व त्याद्वारे निर्यातवाढ होणे गरजेचे असते. भारतात निर्यातवाढ अजुन मात्र कमी आहे. मात्र मोठमोठी यंत्रसामुग्री व तंत्रज्ञान आयातीमुळे व्यापारतोलातील तुट वाढत आहे.

**४. पेट्रोलियम पदार्थाच्या वाढत्या किमती :-**आं.रा. बाजारपेठेत कच्चे तेल व इतर पेट्रोलियम पदार्थाच्या किमती दररोज वाढत आहे. परंतु यांच्या आयातीशिवाय पर्याय नाही. म्हणुन वाढत्या किमतीलाही आपल्याला पेट्रोलियम पदार्थाची आयात करावीच लागते. त्यामुळे व्यापारतोल प्रतीकुल असल्याचे दिसुन येते.

५. **विदेशी फॅशन :-**भारतीय लोक परदेशी राहणीमान जगण्यासाठी वेगवेगळ्या विदेशी वस्तुंची मागणी करत असतात. एखांदी नविन फॅशन आली की लगेच त्यासाठी भारतासारख्या देशांतुन प्रचंड मागणी निर्माण होते. त्यामुळे आयात वाढुन व्यापारतोल प्रतीकुल बनतो.

६. **परकीय वस्तु स्वस्त :-**परदेशांत तयार होणाऱ्या वस्तु कमी किमतीत उत्पादित होतात. भारतात मात्र त्याच वस्तुंचे उत्पादनासाठी जास्त खर्च यतो. तुलनेने परकीय वस्तु स्वस्त मिळते व उपभोक्ते स्वस्त वस्तुची मागणी करतात. त्यामुळे आयात वाढत जाते.

७. **जागतीकीकरणाने आयात खुली :-**भारताने १९९१ मध्ये जागतीकीकरण, उदारीकारण, खाजगीकरण यांचा स्विकार केल्याने आयात -निर्यात खुली झाली. भारताची निर्यात वाढली मात्र आयात प्रचंड वाढली. विदेशी उत्पादकांनी भारतीय बाजापेठेत आपली उत्पादने विक्रिसाठी झेप घेतली. उत्पादकांमध्ये स्पर्धा निर्माण होउन किंमतीही कमी झाली. त्यामुळे मागणी निर्माण होउन आयातीत मोठी वाढ झाली.

८.**अवपुंजन :-**परकीय देश किंवा उत्पादक भारतीय बाजारपेठ काबीज करण्याच्या दृष्टीने उत्पादन खर्चपेक्षाही कमी किमतीत वस्तु विकतात. WTO मधिल तरतुदी तसेच जागतीकीकरणाचे धोरण यामुळे त्या वस्तुंवर आयात शुल्क, जकाती, कोटा, इ. अडथळेही आणने शक्य होत नाही. त्यामुळे आयात वाढत जावुन व्यापारतोलातील तुट वाढत जाते.

**व्यापारतोलातील तुट कमी करण्यासाठी उपाययोजना :-**

१. **शेतमाल निर्यातीवर विशेष लक्ष :-**भारतीय शेतमालाला परदेशात मागणी असुनसुध्दा सरकार देशांतील उपभोक्त्यांना कमी किमतीत असा माल मिळावा म्हणुन निर्यात बंदी करातात. सध्या कांदा या पिकाबाबत असे घडले आहे. यापुर्विही उस, कापुस, द्राक्षे, इ. बाबत सरकार उत्पादकांचे हित लक्षात घेत नाही. त्याचे २ परीणाम होतात. एक तर निर्यात कमी होते आणि दुसरे म्हणजे अशा वस्तु उत्पादीत करणाऱ्या उत्पादकांना उत्पादन वाढीची प्रेरणा राहत नाही. म्हणजे या वस्तुचे उत्पादन मुद्दाम कमी केले जाते. म्हणुन परदेशांत मागणी असणाऱ्या वस्तुंची जास्तीत जास्त निर्यात केली जावी व त्यासाठी सरकारने पुढाकार घ्यावा.

२. **आयात पर्यायीकरण :-**आयात केल्या वस्तु देशांत उत्पादीत करणे शक्य असेल तर तसे प्रयत्न करावे. त्यामुळे आयात तर कमी होइलच पण त्याचबरोबर देशांत रोजगारही उपलब्ध होईल.व व्यापारतोलातील तुट कमी करता येईल.

३. **व्यापार धोरणात बदल :-**भारतीय व्यापार धोरणे ही आयातील प्रोत्साहन देणारी व निर्यातीत घट करणारी अशी आहेत. निर्यातीसाठी परवाना, उच्च निर्यात शुल्क , कोटा तर आयातीसाठी खुली अशी विचित्र धोरणे आहे. राज्यकर्ते फक्त मतांवर डोळा ठेऊन उत्पादकांऐवजी उपभोक्त्यांचे हित जोपासण्याचा प्रयत्न कायम करते. सरकारने जर आपल्या व्यापार धोरणात बदल केला तर व्यापारातील तुट कमी करता येईल.

**४. चंगळवादाला आळा बसविणे :-**चैनिच्या वस्तु तसेच फॅशन इ. मुळेही भारताची आयात वाढते आहे. यावर जर थोड्या जास्त प्रमाणात जकात व इतर कर लादले तर या वस्तुंच्या किमती वाढतील व मागणी घटण्यास मदत होइल. त्याद्वारे व्यापारतोलातील तुट कमी करात येईल.

**५. निर्यात उद्योग प्रोत्साहन :-**ज्या उद्योगातुन निर्यात वाढ होणे शक्य आहे. त्या उद्योगात मोठ्या प्रमाणात गुंवणुक करुन जास्तित जास्त उत्पादन वाढ करता येईल व निर्यात वाढुन व्यवहारतोलातील तुट कमी होईल.

